१. शाखेचे नांव:- **महसूल शाखा.**

२. पत्ता:- विभागीय आयुक्त कार्यालय कोकण विभाग.

३. कार्यालय प्रमुखः विभागीय आयुक्त.

४. शासकीय विभागाचे नावं:- महसूल व वन विभाग.

५. कोणत्या मंत्रालयातील खात्याचा अधिनस्त - महसूल व वन विभाग.

६. कार्यक्षेत्र:- विभागीय कार्यक्षेत्र (मुंबई शहर / मुंबई उपनगर / ठाणे / पालघर / रायगड / रत्नागिरी व सिंधुदूर्ग या सात जिल्हयांचे कार्यक्षेत्र)

७. विशिष्ट कार्ये:- महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत कामकाज.

८. कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक:- ०२२-२७५७१५१७/२७५७८००३

९. ई-मेल:- rbkonkan@gmail.com

१०. संकेतस्थळ:- www.divcomkonkan.gov.in

**पदनिहाय रचना / तक्ता**

**विभागीय आयुक्त (कोकण विभाग)**

↓

अपर आयुक्त (महसूल)

↓

तहसिलदार (महसूल)

↓

नायब तहसिलदार (महसूल)

↓

सहाय्यक महसूल अधिकारी १ ते ६

↓

महसूल सहाय्यक १ते ३

↓

शिपाई

**कामाची कार्यपध्दती –**

१) **शासकीय जमीन/गुरचरण जमीन प्रदान करणे.**

- शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दिनांक २७/०७/२०११, तसेच शासन, वित्त विभाग यांचेकडील निर्णय क्र. विअप्र-२०१९/प्र.क्र.२०/२०१९/नियम दिनांक ०८/०८/२०१९ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या जमीन प्रदान अधिकार व वित्तीय मर्यादेबाहेर असलेली शासकीय जमीन विविध शासकीय प्रयोजनासाठी व खाजगी व्यक्तिंना कब्जेहक्काने देण्याबाबतचे जिल्हास्तरावरून प्राप्त झालेले प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर केले जातात.
- गायरान/गुरचरण जमीन वितरणाबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देशानुसार गायरान जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा सार्वजनिक प्रकल्पांसाठी परिवर्तित करणेबाबतचे जिल्हास्तरावरून प्राप्त झालेले प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर केले जातात.
- शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत जिल्हास्तरावरून प्राप्त झालेले प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर केले जातात.

२) **भोगवटादार वर्ग २ चे जमिनीचे भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरण.**

- शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र दिनांक १५ जून, २०२३ नुसार भोगवटार वर्ग-२ तसेच भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करण्याबाबतची सहकारी गृहनिर्माण संस्थांबाबतची जिल्हास्तरावरून प्राप्त झालेली प्रकरणे विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर केली जातात.
- नवीन अविभाज्य सत्ता प्रकाराने प्रदान करण्यात आलेल्या भूखंडांमध्ये भूखंडधारकाकडून झालेला शर्तभंग नियमानुकूल करणेबाबतचे जिल्हास्तरावरून प्राप्त झालेले प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर केले जातात.

३) **महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६अ अन्वये आदिवासी जमीनी बिगर आदिवासीला विक्रीने हस्तांतरीत करणे.**

- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६अ खालील आदिवासी व्यक्तींनी धारण केलेल्या जमिनी बिगर आदिवासीला विक्रीने हस्तांतरीत करणेबाबतचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त प्रस्ताव मंजूरी करीता विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर करण्यात येतात.

४) **महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६अ अन्वये आदिवासी जमीनी शासकीय प्रकल्पासाठी थेट खरेदी.**

- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६अ खालील आदिवासी व्यक्तींनी धारण केलेल्या जमिनी राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त सार्वजनिक प्रकल्पांसाठी थेट खरेदीव्दारे किंवा भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०२३ (सन २०१३ चा अधिनियम ३०) खाली भूसंपादनाव्दारे जमीन संपादन करताना पूर्वपरवानगी देण्याशी संबंधित असतील, ते अधिकार संबंधित महसूल विभागाच्या विभागीय आयुक्त यांना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१३/०४/२०१७ अन्वये देण्यात आले आहेत.

५) **भूदान उपसमितीची रचना.**

- राज्यातील महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ आणि मध्यप्रदेश भूदान यज्ञ अधिनियम, १९५३ या कायद्याखालील जमिनीच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्यासाठी यासंदर्भात सर्वंकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारशी करण्याकरीता मा. प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. उपसचिव, महाराष्ट्र शासन (महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई) यांज कडील पत्र क्र. भूदान २०२२/प्र.क्र. ४६/ज-१ अ दिनांक ११/१२/२०२४ व या कार्यालयाकडील दि.२६/१२/२०२४ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील विदर्भ क्षेत्र वगळता राज्याच्या उर्वरीत विभाग, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर या क्षेत्रासाठी लागू असलेल्या तरतूदींचा अभ्यास करुन मा. प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीस अहवाल सादर करण्यासाठी, मा. विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करण्यात आली आहे.

६) **पेसा ॲक्ट अनुसुचित क्षेत्रातील पेसा गाव घोषीत करण्याबाबत.**

- अनुसुचित क्षेत्रातील पेसा गाव घोषीत करण्याबाबत शासन अधिसूचना दि.०४/०३/२०१४ व शासन निर्णय दि.१९/०५/२०१५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
- ज्या वाडी/ वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांचा समुह यांच्याकडून प्राप्त झालेल्या ठरावाबाबत जिल्हाधिकारी यांची खात्री झालेनंतर अशा समुहाच्या ठरावावर उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त अहवालावर जिल्हाधिकारी आपली शिफारस मा.विभागीय आयुक्तांकडे करतील. (अनुसूची IV)
- मा. विभागीय आयुक्त त्यावर नमुना अनुसुची V मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचना काढतील.

७) **तालुका विभाजन समिती.**

- तालुका विभाजनाच्या अनुषंगाने सुधारीत निकष निश्चित करण्याबाबत शासन, महसूल व वन विभागाकडील दि.०२.०३.२०२३ रोजीच्या परिपत्रकांन्वये विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय तालूका पुर्नरचना समिती गठीत करण्यात आलेली आहे.
- सदर समितीचा दि.२१.०२.२०२४ रोजी शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे.
- सदर अहवालाच्या अनुषंगाने शासन पत्र दि.१९/०३/२०२४ अन्वये ७ मुद्यांची माहिती शासनास पाठविणेबाबत कळविणेत आले असून, त्यानुसार सर्व विभागीय आयुक्त यांना या कार्यालयाकडील दि.२३/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधित मुद्यांची माहिती दि.२९/०४/२०२४ पर्यंत पाठविणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती यांचे कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली आहे. सदर माहितीची छाननी करण्याचे काम चालू आहे. विभागीय आयुक्त नागपूर यांचे कार्यालयाकडून माहिती येणे बाकी आहे.

८) **कांदळवन क्षेत्र घोषित करण्याबाबत.**

- कांदळवनाखालील क्षेत्र भारतीय वन अधिनियम,१९२७ चे कलम-४ व कलम २० अन्वये सदरचे क्षेत्र राखीव वन म्हणून घोषीत करावयाची अंतिम अधिसूचना प्रसिध्द करणेबाबत जिल्हास्तरावरुन प्राप्त होणारे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.
- शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दिनांक १६.१०.२०१८ अन्वये राज्यातील सागर तटीय जिल्हयांकरीता कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे.

➢ शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दिनांक १७.१०.२०१६ अन्वये कोकण विभागातील वेटलँडसंदर्भात पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.

## ९) विभागीय वन हक्क समितीची रचना.

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २ | मुख्य वन संरक्षक किंवा उप मुख्य वनसंरक्षक दर्जाच्या अधिका-यापेक्षा कमी दर्जा नसलेला मुख्य वन संरक्षक यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | समितीचे अध्यक्ष यांनी नामनिर्देश करावयाचे अनुसुचित जमातीचे अशासकीय 3 तज्ञ सदस्य (ज्यापैकी किमान एक महिला सदस्य असतील) | सदस्य |
| ४ | अपर आयुक्त, आदिवासी विकास किंवा ज्या विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी असा अधिकारी उपलव्ध नसल्यास आदिवासी विकास विभागाने नामनिर्देशित केलेला अधिकारी | सदस्य सचिव |

## १०) नैसर्गिक आपत्ती.

➢ शासन महसूल व वन विभाग यांचेकडील दिनांक २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयात नमूद केलेनुसार केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निकषाच्या धर्तीवर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या आपदग्रस्त व्यक्तींना सन २०२२-२३ ते सन २०२५-२६ या कालावधीमध्ये मदतीचे दर व निकष लागू करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त होणारे मदत निधीबाबतचे प्रस्ताव शासनास सादर केले जातात.

➢ शासन महसूल व वन विभाग यांचेकडील दिनांक ०१ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयात नमूद केलेनुसार नोव्हेंबर २०२३ मधील अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या व त्यापुढील कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर मदत करण्याकरिता वाढीव दराने निविष्ठा अनुदान स्वरुपात (३ हेक्टर मर्यादेपर्यंत) मदत करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून प्राप्त होणारे शेतीपिके नुकसानीबाबतचे अ, ब,क, ड अहवाल शासनास सादर केले जातात. मदतीचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बाब | प्रचलित दर (SDRF) | मदतीचे वाढीव दर |
|---|---|---|---|
| १. | जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी मदत | रु. ८,५००/ प्रति हेक्टर, २ हेक्टरच्या मर्यादेत | रु.१३,६००/ प्रति हेक्टर, ३ हेक्टरच्या मर्यादेत |
| २. | बागायत पिकांच्या नुकसानीसाठी मदत | रु. १७,०००/-प्रति हेक्टर, २ हेक्टरच्या मर्यादेत | रु.२७,०००/ प्रति हेक्टर, ३ हेक्टरच्या मर्यादेत |
| ३. | बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी मदत | रु. २२,५००/- प्रति हेक्टर, २ हेक्टरच्या मर्यादेत | रु.३६,०००/ प्रति हेक्टर, ३ हेक्टरच्या मर्यादेत |